७२० एस सी आर (१९५३)

मोतीपूर जमीनदारी कंपनी लिमिटेड.

विरुद्ध

बिहार राज्य आणि इतर.

---------------------------------

राजा जानकीनाथ रॉय आणि नरेंद्र नाथ रॉय आणि  कंपनी लिमिटेड.

विरुद्ध

बिहार राज्य आणि इतर.

[सरन्यायाधीश पतंजली शास्त्री, मुखर्जीया, एस. आर. दास, गुलाम हसन आणि भगवती न्या. न्या. ]

बिहार भूमिसुधार सुधारणा कायदा, १९५०, कलम २ (ओ) आणि (आर), ३ - 'व्यक्ती', 'मालक', 'भुधृतिधारक' व कंपनी यांच्यासाठी कायद्याचा लागू होणारा अर्थ.

‘मालक’ आणि ‘भुधृतिधारक’ यांच्या बिहार भूमिसुधार कायदा, १९५० च्या कलम २ (ओ) व (आर) मधील व्याख्येमध्ये “व्यक्ति” या शब्दात भारतीय कंपनी कायदा, १९१३ च्या अंतर्गत विधीस्थापित केलेल्या कंपन्याही समावेश होतो. 'मालक' आणि 'भुधृतिधारक' या शब्दांमध्ये कंपनीचा समावेश करण्यापासून रोखण्यासाठी कायद्याचा विषय किंवा  संदर्भ यात काहीही आक्षेपार्ह नाही. याउलट, कायद्याच्या उद्देशाला पूर्ण प्रभाव देण्यासाठी हा समावेश असणे आवश्यक आहे.

फार्मास्युटिकल सोसायटी वि. लंडन आणि  प्रोव्हिन्शिअल सप्लाय असोसिएशन, लिमिटेड (१८८०) ५ अँप. केस. ८५७ ह्या न्यायनिर्णयाशी वेगळा विचार मांडणारा न्यायनिर्णय.

दिवाणी अपील न्यायाधिकरणः १९५३ चे दिवाणी अपील क्रमांक ६२ आणि ६३. पाटणा येथील उच्च न्यायालयातील (रामास्वामी आणि सरजू प्रसाद जे. जे.) १९५२ च्या किरकोळ न्यायिक प्रकरणे २३८ व २४२ मध्ये पारित झालेल्या २२ डिसेंबर १९५२ च्या निकालाविरुद्ध भारतीय संविधानाच्या अनुच्छेद १३२ (१) अन्वये अपील.

पी. आर. दास (जे. सी. सिन्हा आणि एल. के. चौधरी, त्यांच्यासोबत) दोन्ही याचिकांमध्ये अपीलकर्त्यासाठी.

एम. सी. सीतलवाड, भारताचे महाधिवक्ता (एल. एन. सिन्हा आणि बजरंग सहाय, त्यांच्यासोबत) यांनी दोन्ही याचिकांमधील उत्तरवादींसाठी.

१७ एप्रिल १९५३. न्यायालयाचा न्यायनिर्णय एस. आर. दास जे. यांनी पारीत केला.

दास जे. - हा न्यायनिर्णय सिव्हिल अपील क्रमांक ६२/१९५३ आणि ६३/१९५३ निकालात काढते, जे एकत्रितपणे ऐकण्यात आले आहेत.

सिव्हिल अपील क्रमांक ६२/१९५३ मधील अपीलकर्ता, मोतीपूर जमींदारी कंपनी लिमिटेड, १९३२ मध्ये भारतीय कंपनी कायद्या अंतर्गत विधिस्थापित झाली होती आणि तिचे नोंदणीकृत कार्यालय बंगालमध्ये आहे. ही कंपनी मोतीपूर सुगर फॅक्टरी लिमिटेड या त्यांच्याच भगिनी कंपनीला ऊस पुरवते. सिव्हिल अपील क्रमांक ६३/१९५३ मधील अपीलकर्ता, राजा जानकीनाथ रॉय आणि नरेंद्र नाथ रॉय आणि कंपनी लिमिटेड, १९३३ मध्ये भारतीय कंपनी कायद्यातर्गत विधिस्थापित झाली होती आणि तिचे नोंदणीकृत कार्यालय देखील बंगालमध्ये आहे. ही कंपनीच्या मालकीची जमीनदारी मालमत्ता ही बिहार राज्यातील पूर्णिया आणि पश्चिम बंगाल राज्यातील मालदामध्ये आहे. ही कंपनी इतर व्यवसायासोबत बँकर आणि वित्त पुरवठा करण्याचा व्यवसाय करते.

३० डिसेंबर १९४९ रोजी, बिहार जमीन सुधारणा विधेयक हे विधेयक बिहार विधानसभेने पारित केले आणि राष्ट्रपतींच्या विचारासाठी राखीव ठेवल्यानंतर ११ सप्टेंबर १९५० रोजी त्याला मान्यता मिळाली. अशाप्रकारे पारित आणि मान्यता दिलेला कायदा २५ सप्टेंबर १९५० रोजी बिहार राजपत्रात प्रसिद्ध करण्यात आला होता आणि त्याच दिवशी राज्य सरकारला सदर कायद्याच्या कलम १ (३) अंतर्गत प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून जारी केलेल्या अधिसूचनेद्वारे अंमलात आला होता . अनेक मालक आणि जमीनदारी मालमत्तेचे भुधृतिधारक यांनी  राज्य सरकारला कायद्याच्या तरतुदींनुसार मालमत्ता ताब्यात घेण्यापासून प्रतिबंधित करण्यासाठी योग्य आदेश मिळण्यासाठी बिहार सरकारविरुद्ध प्रकरणे दाखल केली, ज्यांचा दावा होता की बिहार विधानसभेच्या विधानसभा योग्यतेच्या पलीकडे आहे आणि अन्यथा चुकीचे आहे. १२ मार्च १९५१ रोजी, पटना उच्च न्यायालयाच्या एका विशेष खंडपीठाने ठरवले की, संविधानाच्या अनुच्छेद १४ च्या उल्लंघन असल्यामुळे हा कायदा घटनाबाह्य आहे. या न्यायनिर्णयाविरुद्ध बिहार सरकारने या न्यायालयात अपील केले. हा अपील प्रलंबित असताना, हंगामी संसदेने घटना (पहिली सुधारणा) कायदा, १९५१ पारित केला. मुख्य अपीलातील उत्तरवादींनी या न्यायालयात प्रकरण दाखल करून असा दावा केला की, संविधान सुधारित करणारा कायदा अवैध आहे. तथापि, या न्यायालयाने ५ ऑक्टोबर १९५१ रोजी संविधान सुधारित करणारा कायदा वैध असल्याचे समर्थन केले. ६ नोव्हेंबर १९५१ रोजी, बिहार कायद्याच्या कलम ३ अंतर्गत अधिसूचना जारी करण्यात आल्या ज्यात म्हटले आहे की अधिसूचनेत नमूद केलेल्या अपीलकर्त्यांच्या मालकीच्या काही टौजी राज्य सरकारकडे गेल्या आहेत आणि त्यांची मालकी राज्य सरकारकडे आहे. दोन्ही अपीलकर्त्यांनी संविधानाच्या अनुच्छेद २२६ अंतर्गत पटना उच्च न्यायालयात वेगवेगळ्या याचिका दाखल केल्या आणि त्यातील उत्तरवादींना अपीलकर्त्यांच्या संबंधित मालमत्ता किंवा धारणाधिकार हे  त्या अधिसूचनांनुसार ताबा घेण्यापासून प्रतिबंधित करण्यासाठी किंवा इतर सहाय्यक दिलास्यासाठी मॅडंमस (आदेश देण्यासाठीची याचिका) किंवा योग्य निर्देश किंवा आदेश देण्याची प्रार्थना केली.

कायदा रद्द असल्याचे घोषित करणाऱ्या विशेष खंडपीठाच्या आदेशाविरुद्ध बिहार सरकारने दाखल केलेल्या अपील या न्यायालयापुढे

सुनावणीसाठी आले आणि या न्यायालयाने बहुसंख्य निर्णयात नमूद केलेल्या काही तरतुदींशिवाय कायद्याची वैधता कायम ठेवली, ज्यांना विभाज्य करण्यायोग्य असल्याचे ठरले. त्यानंतर, पटना उच्च न्यायालयासमोर अनुच्छेद २२६ अंतर्गत दोन्ही अपीलकर्त्यांनी दाखल केलेल्या दोन्ही याचिका सुनावणीसाठी आल्या आणि त्या न्यायालयाच्या एका खंडपीठाने २२ डिसेंबर १९५२ रोजी फेटाळले. या फेटाळण्याविरुद्ध पटना उच्च न्यायालयाच्या परवानगीने सध्याचे अपील दाखल करण्यात आले आहेत.

उच्च न्यायालयासमोर उपस्थित केलेला प्रश्न हा होता की, कायद्याचा खरा अर्थ लावला असता, तो भारतीय कंपनी कायद्यातर्गत नोंदणीकृत कंपन्यांच्या जमीनदारी संपत्तीसाठी लागू करण्याचा हेतू होता का. अपीलकर्त्यांच्या अशा युक्तिवादाला समर्थन देण्यासाठी की तो नव्हता, असे म्हटले गेले की, बिहार विधिमंडळाला व्यापारी महामंडळे किंवा व्यापारेतर  महामंडळे ज्यांचे ध्येय एका राज्यापुरते मर्यादित नव्हते त्यांच्याबाबत कायदे करण्याचा अधिकार नव्हता. यादी १ मधील नोंद ४३, ४४ आणि ४५ चा संदर्भ देण्यात आला आहे हे दाखवण्यासाठी की, त्या यादीमध्ये नमूद केलेल्या बाबतीत कायदे करण्याचा अधिकार फक्त संसदेला आहे. युक्तिवाद असा होता की, बिहार विधिमंडळाने कायदा करून केंद्र सरकारच्या अधिक्षेत्रावर आक्रमण केले आहे आणि म्हणून कायदा अवैध आहे. कंपनी कायद्यातील कंपनी बंद करण्याच्या तरतुदी आणि या कायद्याच्या तरतुदींचा एकत्रित संदर्भ देऊन या युक्तिवादाला बळ देण्याचा प्रयत्न करण्यात आला. पटना उच्च न्यायालयाने या युक्तिवादाला फेटाळले आणि या अपीलांच्या समर्थनार्थ हजर असलेल्या श्री. पी. आर. दास यांनी पटना उच्च न्यायालयाच्या या निर्णयातील हा भाग आव्हानित केलेला नाही.

श्री पी. आर. दास यांचा मुख्य मुद्दा असा आहे की बिहार विधानमंडळाला, विधिसंस्थापित कंपन्यांच्या जमीनदारी संपत्ती अधिग्रहणासाठी कायदा करण्याचा अधिकार असला तरी, प्रत्यक्षात कायद्याद्वारे असे केले नाही. कलम ३ राज्य सरकारला अधिसूचनाद्वारे घोषित करण्यास अधिकृत करते की मालक किंवा भुधृतिधारक यांची संपत्ती किंवा भुधृति हे राज्य सरकारकडे गेले आणि ते राज्य सरकारच्या नावे निहित झाले आहे . हे येथे नमूद करणे महत्वाचे ठरले जाईल की याच कलमाअंतर्गत राज्य सरकारने ६ नोव्हेंबर १९५१ रोजी राज्यात असलेल्या अपीलकर्त्यांच्या संपत्तीबाबत अधिसूचना जारी केल्या. श्री. पी.आर. दास यांचा मुख्य म्हणणे असे आहे की अपीलकर्ते कंपन्या ह्या  सदर कायद्याद्वारे व्याख्या केलेल्या "मालक" किंवा "भुधृतिधारक " या संज्ञेत बसत नाहीत आणि त्यामुळे त्यांच्या संपत्तीचा कोणताही भाग राज्य सरकारच्या नावे निहित करण्याचा हेतू नव्हता किंवा प्रत्यक्षात निहित झाला नाही. "मालक" ही संज्ञा कलम २ (ओ) द्वारे व्याख्यायित केली आहे की संपत्ती किंवा संपत्तीचा भाग न्यास म्हणून धारण करणारा किंवा त्याच्या स्वतःच्या फायद्यासाठी मालकी असलेली व्यक्ती आणि मालकाचे वारस आणि हितसंबंधी उत्तराधिकारी समाविष्ट आहे आणि मालक अल्पवयीन किंवा विकल मनाचा किंवा मूर्ख असल्यास, त्याचे पालक, समिती किंवा इतर कायदेशीर अभिरक्षक होय. मालकाकडून किंवा कोणत्याही भुधृतिधारकाकडून जमीन संपादन  करण्याचा अधिकार प्राप्त केलेल्या व्यक्ती म्हणून कलम २ (आर) द्वारे "भुधृतिधारक" ही संज्ञा व्याख्यायित केली आहे. युक्तिवाद असा आहे की वरील दोन संज्ञांमधील "व्यक्ती" ह्या शब्दात सदर कायद्याच्या संदर्भात कंपनी समाविष्ट नाही. बिहार सर्वसाधारण  वाक्खंड  अधिनियम कलम ४ (४०) अंतर्गत सामान्यतः "व्यक्ती" या शब्दात कंपनी समाविष्ट आहे हे मान्य आहे, परंतु श्री. पी.आर. दास यांनी असा युक्तिवाद केला की या कलमात दिलेल्या संज्ञा केवळ विषयात किंवा संदर्भात कोणतीही विसंगती नसलेल्या प्रकरणात लागू होतात. त्यांचा युक्तिवाद असा आहे की "मालक" आणि "भुधृतिधारक" यांच्या व्याख्येवरून असे दिसून येते की कंपनी जिच्या मालकीची जमीनदारी आहेत ते या व्याख्येत येत नाही. आम्हाला हा युक्तिवाद मान्य करता येत नाही. हे निर्विवाद आहे की एखादी संपत्ती किंवा संपत्तीचा भाग हा एखादया कंपनीच्या  मालकीचा असू शकतो आणि, खरं तर, अपील करणारी कंपनी ही त्यांच्या मालकीची संपत्ती संरक्षित करण्यासाठीच या

अपीलांमध्ये लढत आहे. म्हणून, ते व्याख्येच्या पहिल्या भागात येतात. शब्दाचा अर्थ काय आहे ते सांगितल्यानंतर, ती व्याख्या विशिष्ट परिस्थितीत आणखी काय समाविष्ट करेल ते सांगते, जसे की, वारस आणि हितसंबंधी उत्तराधिकारी इ. "वारस" हा शब्द निश्चितच कंपनीच्या बाबतीत उचित नाही, परंतु कंपनीला हितसंबंधी उत्तराधिकारी असण्यात काहीही अनुचित नाही. हे दर्शविण्यात आले आहे की मालकाच्या व्याख्येत संचालक, व्यवस्थापकीय अभिकर्ता आणि जर कंपनी बंद होत असल्यास (दिवाळखोरीसाठी) कंपनीचे परिसमापक यांचा समावेश करण्याची तरतूद नाही. परिभाषित केल्याप्रमाणे 'मालक' ह्या शब्दात कंपनीचा समावेश होत नाही असे मानण्यासाठी एकही ठोस कारण असल्याचे आम्हाला दिसत नाही. ह्याची नोंद घ्यावी कि अभिकर्ता किंवा नादारीच्या बाबतीत खाजगी मालकाचे सरकारी किंवा धारक जे सुध्दा व्याख्येत समाविष्ट नाहीत. अल्पवयीन किंवा विकल मनाचा किंवा मूर्ख असलेला मालक आणि त्याचा पालक इत्यादिचा संदर्भ येथे नमूद करणे स्पष्टपणे आवश्यक होते कारण असे मालक कायदेशीरित्या अक्षम आहेत.

श्री. पी. आर. दास हे कायद्याच्या कलम ४३ अंतर्गत तयार केलेल्या विविध कलमे आणि नियमांचा संदर्भ देऊन हे दाखवतात की, कंपनीला हि कायद्यांतर्गत समाविष्ट असलेल्या कृती करण्यास सक्षम नाही असा युक्तिवाद त्यांनी केल्यामुळे, केवळ नैसर्गिक व्यक्तींना या कायद्याद्वारे प्रभावित करण्याचा हेतू होता. श्री. पी. आर. दास यांनी असा विवाद केला नाही की, विधिसंस्थापित कंपनीला आणि त्यांचे संचालक किंवा व्यवस्थापकीय अभिकर्ता किंवा यासंबंधी अधिकृत इतर अधिकारी यांच्यामार्फत या सर्व कृती करण्यास कोणतीही अडचण नाही, परंतु ते असा युक्तिवाद करतात की भारतीय कंपनी अधिनियमाच्या तरतुदी या अधिनियमाच्या तरतुदींच्या अनुषंगाने विचारात घेऊ नये. ते मुख्यत्वे फार्मास्युटिकल सोसायटी विरुद्ध लंडन आणि प्रोवीन्शियल सप्लाय असोसिएशन, लिमिटेड [1] या खटल्यावर अवलंबून आहेत, ज्यामध्ये असा निर्णय देण्यात आला की, फार्मसी अधिनियम, १८६८ (३१ आणि ३२ 'विक'., प्रकरण १२१) यामध्ये वापरलेल्या "व्यक्ती" या शब्दाच्या कक्षेत

1 (१८८०) एल. आर. ५ अँप. केस. ८५७
२ (१८८०) एल.आर. ५ अँप. केस. ८५७.

महामंडळ येत नाही. लॉर्ड सेल्बोर्न एल. सी. यांच्या पान क्रमांक ८६३ वरील निरीक्षणांवर भिस्तठेवण्यात अली होती. त्या अधिनियमाच्या प्रस्तावनेमध्ये इतर गोष्टींबरोबर असे म्हटले आहे की, " विषाची किरकोळ विक्री, ते तयार करणे किंवा त्याचे मिश्रण करणे यासाठी दुकाने चालवणाऱ्या आणि रसायनतज्ञ आणि औषधतज्ञ म्हणून ओळखल्या जाणाऱ्या व्यक्तींना त्यांच्या व्यवसायाचे योग्य प्रायोगिक ज्ञान असावे ही जनतेच्या सुरक्षिततेसाठी फायदेशीर आहे." हे स्पष्टपणे औषधशास्त्रात कुशल व्यक्तीबद्दल बोलते, या विशिष्ट व्यवसायाबद्दल काहीही माहिती नसलेल्या व्यक्तिनिरपेक्ष निगम निकायाबद्दल नाही. खरं तर, लॉर्ड ब्लॅकबर्न यांनी फार्मास्युटिकल सोसायटी केस [२] मध्ये हाउस ऑफ लॉर्ड्समध्ये केलेल्या भाषणात ह्या प्रस्तावनेचा संदर्भ दिला आणि पृष्ठ क्र. ८७० वर असे निरीक्षण आहे केले कि: -

> “इथेच थांबून, हे अगदी स्पष्ट आहे की ज्यांनी ही भाषा वापरली त्यांनी महामंडळांचा विचार केला नव्हता. एकाअर्थी महामंडळाने सार्वजनिक हितरक्षणाच्या सर्व महत्त्वपूर्ण हेतूंसाठी, सक्षम संचालक, व्यवस्थापक इत्यादी नियुक्त केले तर त्याच्या व्यवसायाचे सक्षम ज्ञान असू शकते. परंतु त्याला स्वतःहून सक्षम ज्ञान असणे शक्य नाही. तत्वज्ञानविषयक व्यक्तीत्व, कायदेशीर "व्यक्ती", महामंडळ यांना सक्षम ज्ञान असणे शक्य नाही. तसेच, एखादे महामंडळ हे " रसायनतज्ञ आणि औषधतज्ञ म्हणून ओळखली जाणारी व्यक्ती" असू शकते असे मला वाटत नाही.”

नंतर माननीय न्यायमूर्तींनी त्या कायद्याच्या कलम १ आणि १५ च्या तरतुदींचा संदर्भ दिला आणि असा निष्कर्ष काढला की त्या कायद्यातील "व्यक्ती" हा शब्द म्हणजे नैसर्गिक व्यक्ती. ह्याचा परिणाम असा झाला की, एखाद्या कायद्यातील "व्यक्ती" हा शब्द महामंडळ समाविष्ट करणारा मानला जाऊ शकतो की नाही हे त्या कायद्याची उद्दिष्टे आणि त्या उद्दिष्टाची अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने पारित केलेला कायदा विचारात घेऊन ठरवले पाहिजे. त्या कायद्याच्या प्रस्तावनेत नमूद केलेल्या उद्दिष्टाच्या दृष्टीने त्या कायद्यातील "व्यक्ती" या शब्दाचा अर्थ महामंडळ असा असू शकत नाही यात शंका घेण्याची काहीच आवश्यकता नाही. लॉर्ड सेल्बोर्न यांनी पान क्रमांक ८६३ च्या शेवटी १८ व्या कलमाचा संदर्भ देत असे नमूद केले की, विधिमंडळाने "व्यक्ती" या शब्दाचा अर्थ

केवळ व्यक्ती असा केला कारण त्या कायद्याच्या विषयाशी महामंडळाला समाविष्ट करणे स्पष्टपणे विसंगत होते. श्री. पी. आर. दास यांनी असा युक्तिवाद केला की, लॉर्ड सेल्बोर्न यांच्या न्यायनिर्णयाचा आधार हा होता की महामंडळ हे "व्यक्ती" या संज्ञेत येऊ शकत नाही कारण महामंडळाला स्वाक्षरित लेखी अर्ज करणे त्याला शक्य नाही. यावरून श्री. पी. आर. दास यांनी असा युक्तिवाद केला आहे की, लॉर्ड सेल्बोर्न यांच्या न्यायनिर्णयाच्या या भागातून असा आवश्यक निष्कर्ष निघतो की दुसरा कायद्याचा अर्थ लावण्यासाठी कंपनी अधिनियमाच्या ह्या तरतुदी विचारात घेण्याची परवानगी नाही. जर लॉर्ड सेल्बोर्न यांच्या भाषणाचा हा अर्थ असता तर, आदराने, आम्हाला तो मान्य करता येत नाही. खरं तर, कंपनी ही कंपनी अधिनियमाची निर्मिती आहे यासाठी कंपनी अधिनियमाच्या तरतुदी डोळ्यासमोर नसल्याशिवाय कंपनीबद्दल विचार करणे शक्य नाही. तिचे अस्तित्व, अधिकार आणि हक्क हे सर्व त्या अधिनियमाद्वारे नियंत्रित केले जातात. प्रकरणातील श्री. पी. आर. दास यांनी भिस्त ठेवलेल्या लॉर्ड्सच्या भाषणांचे हे म्हणणे आहे की, विचाराधीन असलेल्या विशिष्ट अधिनियमाचे उद्दिष्ट हे त्या अधिनियमात वापरल्याप्रमाणे "व्यक्ती" या संज्ञेत "महामंडळ" हा शब्द समाविष्ट करण्यास पूर्णपणे विसंगत होते आणि आमच्या समजुतीनुसार, तो निर्णय त्याहून अधिक काहीही सांगत नाही.

एखादी कंपनी जिच्या मालकीची एखादी मालमत्ता आहे ती कायद्याद्वारे प्रभावित होण्याचा हेतू कधीच नव्हता असे त्यांचे म्हणणे सिद्ध करण्यासाठी, श्री. पी. आर. दास यांनी भारतीय कंपनी अधिनियमातील कंपनी बंद (दिवाळखोरीसाठी) करण्याच्या कलमांकडे आमचे लक्ष वेधले आणि पुढे असा युक्तिवाद केला की कंपनी बंदची योजना ही बिहार अधिनियमाच्या योजनेत बसूच शकत नाही. जर कंपनीची जमीनदारी मालमत्ता घेतली गेली आणि अहस्तांतरणीय बाँडद्वारे भरपाई दिली गेली तर, कंपनी दिवाळखोर झाल्यास कंपनी समाप्तीच्या कायद्याचा वापर करणे अशक्य होईल, असे ते म्हणतात. त्यांच्यानुसार, ज्या न्यायालयामध्ये समाप्तीची कार्यवाही सुरु असेल, जे कदाचित दुसऱ्या राज्यात असू शकते आणि बिहार सरकार आणि त्यांच्या अधिकाऱ्यांमध्ये अधिकारते वरून संघर्ष निर्माण होईल, अधिकार क्षेत्राचा संघर्ष निर्माण होईल. या युक्तिवादात आम्हाला कोणताही जोर दिसत नाही. कलम ३ अंतर्गत अधिसूचना जारी झाल्यावर, जमीनदारी मालमत्ता राज्य

सरकारमध्ये निहित केली जाईल आणि कंपनीचा त्यात कोणताही हिस्सा राहणार नाही. तिचा एकमेव अधिकार हा भरपाई प्राप्त करण्याचा असेल. कंपनीची समाप्ती झाली असेल अशयाबाबतीत परिसमापकाला या अधिनियमाद्वारे प्रदान केलेली उपाययोजना अनुसरावी लागेल. तो किंवा कंपनी यांची स्थिती दुसऱ्या राज्यात नादार होणाऱ्या खाजगी मालकाचा सरकारी मुख्यत्यार किंवा अधिकृत सरकारी धारक यांच्यापेक्षा वाईट राहणार नाही.

अखेरीस, श्री. पी. आर. दास यांनी अधिनियमाच्या कलम ४१ वर भिस्त ठेवली आणि असा युक्तिवाद केला की तो कलम कंपनीला पूर्णपणे लागू न होण्यासारखा आहे आणि या परिस्थितीमुळेच हे दर्शवले जाईल की बिहार विधिमंडळाचा असा हेतू नव्हता की एखादी कंपनी जिच्या मालकीची मालकीची मालमत्ता आहे ती या अधिनियमाद्वारे शासित केली जावी. हे खरे आहे कि, एक महामंडळाला देशद्रोह, गुन्हा किंवा वैयक्तिक हिंसाचार समाविष्ट असलेल्या कोणत्याही गैरवर्तनासाठी किंवा ज्यासाठी एकमेव शिक्षा तुरुंगवास किंवा शारीरिक शिक्षा आहे अशा कोणत्याही गुन्ह्यासाठी जबाबदार धरता येणार नाही (हल्सेबरी, दुसरी आवृत्ती, खंड ९, अनुच्छेद ५, पृष्ठ क्र. १४). कलम ४१ मध्ये केवळ तुरुंगवासाची शिक्षा विहित केलेली नाही. श्री. पी. आर. दास असे सुचवितात की तुरुंगवास किंवा दंड देणे हे गुन्ह्याच्या गंभीरतेवर अवलंबून असते आणि गुन्हेगाराच्या स्वभावावर अवलंबून नसते. तथापि, हा युक्तिवाद श्री. पी. आर. दास भिस्त ठेवलेल्या प्रकरणाच्या अहवालात पृष्ठ ८६९ – ८७० वर नमूद केलेल्या लॉर्ड ब्लॅकबर्न यांच्या मताविरुद्ध वाटतो. डायरेक्टर ऑफ पब्लिक प्रॉसिक्यूशन्स विरुद्ध केंट आणि ससेक्स कॉन्ट्रॅक्टर्स लिमिटेड [३] आणि रेक्स विरुद्ध आय. सी. आर. हॉलेज लिमिटेड आणि इतर [४] या प्रकरणामध्ये असे दिसते की एका महामंडळाला, गुन्ह्यासाठी आवश्यक असलेली इच्छेने केलेली कृती किंवा मनाची स्थिती यासाठी देखील दोषी ठरविले जाऊ शकते. तथापि, कंपनीला जाणीवपूर्वक केलेल्या चुकी किंवा

३ (१९४४) १ के. बी. १४६

४ (१९४४) १ के. बी. ५५१

निष्काळजीपणा यासाठी दोषी ठरविले जाऊ शकते की नाही या विचारासाठी, ज्यासाठी या प्रसंगी आम्हाला निश्चित मत व्यक्त केले पाहिजे असे नाही वाटत नाही, कंपनीचा अधिकारी किंवा अभिकर्ता यांना कलम ४१ च्या तरतुदी लागू करण्यात कोणतीही अडचण येणार नाही. कलम ३ (१) अंतर्गत अधिसूचना प्रकाशित झाल्यानंतर मालमत्ता ही राज्य सरकारच्या नावे निहित होते. कलम ४ हे या निहितीकरणाचे परिणाम सांगते. या कलमाच्या खंड (जी) हा जिल्हाधिकारी यांना लिखित आदेशाद्वारे, निर्धारित पद्धतीने तो बजाऊन एखादी व्यक्ती जिच्या ताब्यात अशा जमिनी किंवा धरणाधिकार किंवा त्याच्या कोणताही भाग आहे त्याचा ताबा आदेशात नमूद केलेल्या तारखेपर्यंत सोडण्यासाठी अधिकृत करते आणि सदर आदेशाचे पालन सुनिश्चित करण्यासाठी आवश्यक ती पावले उचलण्याची किंवा तसे करायला पाडण्याची परवानगी देते. जर मालमत्ता ताब्यात असलेल्या कंपनीचा कोणताही अधिकारी किंवा अभिकर्ता सदर कायदेशीर आदेशाचे पालन करण्यात जाणूनबुजून अयशस्वी झाला किंवा त्याकडे दुर्लक्ष केले तर त्याच्याविरुद्ध कलम ४१ अंतर्गत नक्कीच कारवाई केली जाऊ शकते. त्याचप्रमाणे, कलम ४० अंतर्गत, त्यात उल्लेखित अधिकारी हे निहितीकरणापूर्वी किंवा नंतरच्या तारखेस निर्धारित पध्दतीने लेखी आदेश बजावून अशा प्रकारे मालमत्ता किंवा धरणाधिकार ताब्यात असलेला मालक किंवा भुधृतिधारक किंवा अन्य कोणत्याही व्यक्तीस किंवा अशा मालक, भुधृतिधारक किंवा अन्य व्यक्तीच्या अभिकर्ता किंवा कर्मचाऱ्यास किंवा अन्य कोणत्याही व्यक्तीस आदेशात नमूद केलेल्या वेळी आणि ठिकाणी असे दस्तऐवज, कागदपत्रे किंवा नोंदवही सादर करण्यासाठी किंवा अशा अधिकाऱ्यास सदर कायद्याच्या कोणत्याही हेतूसाठी आवश्यक असलेली अशी मालमता किंवा धरणाधिकाराशी संबंधित माहिती देण्यासाठी भाग पडू शकतात. अशा आदेशाचे पालन करण्यात जाणूनबुजून अयशस्वी झाल्यास किंवा त्याकडे दुर्लक्ष केल्यास कलम ४१ अंतर्गत प्रदान केलेल्या शिक्षेच्या कक्षेत कंपनीचा शिरजोर अधिकारी किंवा अभिकर्ता स्पष्टपणे येतो. म्हणून, कलम ४१ हे सदर विधीप्रस्थापित कंपन्यांना लागू होण्यास अवरोधन करत नाही.

हे नाकारता येणार नाही की, कंपनी ही संपत्तीची मालकी आणि ती धारण करण्यास सक्षम आहे. अशाप्रकारे, ह्या आक्षेपित कायद्याचा संपूर्ण हेतू न्या. महाजन यांनी बिहार राज्य विरुद्ध कामेश्वर सिंह [५] मध्ये असे सांगितले आहे कि:

"आता हे स्पष्ट आहे की, मोठ्या प्रमाणात जमीन काही व्यक्तींच्या हातात केंद्रित होणे हे भारतीय संविधानाच्या तत्त्वांच्या विरुद्ध आहे. त्यामुळे सदर आक्षेपित कायद्याद्वारे विचारात घेतलेल्या संपादनाचा उद्देश म्हणजे काही व्यक्तींच्या हाती जमीनीचे मोठे तुकडे आणि उत्पादन साधने यांचे केंद्रीकरण संपुष्टात आणणे आणि अशा प्रकारे राज्य सरकारच्या हातात येणाऱ्या भौतिक साधनसंपत्तीची मालकी आणि नियंत्रण शक्य तितक्या चांगल्या प्रकारे उपयोजित करणे जेणेकरून ते शक्य तितके सर्वोत्तम प्रकारे सार्वजनिक हिताची सेवा करू शकेल. दुसऱ्या शब्दांत, थोडक्यात सांगायचे तर, सदर कायद्यामागील उद्देश म्हणजे सल्ल्यानुसार समुदायाच्या सर्वसाधारण हितासाठी बिहारच्या जमीन वितरण प्रणालीत सुधारणा आणणे."

या हेतूच्या दृष्टीने, एकमेव मालक आणि मालमत्ता किंवा धारणाधिकार याची मालकी असलेली एखादी कंपनी यांच्यात भेदभाव करण्याचे काही कारण नाही. खरं तर, सदर कायद्याचा विषय किंवा संदर्भ यात अशी कोणतीही गोष्ट नाही जी "मालक" या व्याख्येत मालमत्तेची मालकी असलेली एखादी कंपनी समाविष्ट करण्यास विरोध करेल, अशा प्रकारे समाविष्ट करणे सदर कायद्याच्या मूळ उद्देशाला पूर्णपणे न्याय देण्यासाठी आवश्यक आहे.

१९५३ च्या अपील क्रमांक ६३ मध्ये श्री. पी. आर. दास हे आणखी एक मुद्दा उपस्थित करतात, तो

[५] (१९५२) एस . सी . आर. ८८९ प. ९४१.

म्हणजे त्या अपीलातील अपीलकर्ता कंपनीच्या मालकीच्या मालमत्ता ह्या बिहार जिल्ह्यात पूर्णिया येथे आणि पश्चिम बंगाल जिल्ह्यात मालदा येथे आहेत, परंतु त्या कंपनीला पूर्णिया येथे एकच शासकीय महसूल द्यावा लागतो. पुढे असे अभिकथन केले आहे की, अपीलकर्ता कंपनीने मालमत्तेचा एक भाग पट्टणी भाडे पट्ट्यावर दिला आहे, प्रत्येक पाटणीसमध्ये बिहारच्या आत आणि बाहेर दोन्ही ठिकाणी जमीन आहे. बिहारमध्ये असलेल्या मालमतेच्या त्या भागाला संपादित केल्यामुळे, अपीलकर्ता कंपनीला, तिचा महसूल भरणे किंवा भाडे वसूल करणे अशक्य नसले तरी अवघड झाले आहे. बिहारमध्ये असलेल्या मालमत्तेचा तो भाग उर्वरित भागापासून वेगळा केला जाऊ शकत नाही आणि म्हणून फक्त बिहारमध्ये असलेल्या जमिनीच्या भागाला अंतर्भावित करणारी अधिसूचना अग्राह्य आहे. आमच्या मते या युक्तिवादात कोणतेही तथ्य नाही. उच्च न्यायालयाने नमूद केल्याप्रमाणे, हे महसूल आणि भाडे यांच्या संविभाजनाचे एक साधे प्रकरण आहे. अशा संविभाजनाची आवश्यकता निश्चितपणे अधिसूचनेच्या वैधतेवर परिणाम करू शकत नाही.

वरील कारणांमुळे हे अपील निष्फळ ठरतात आणि त्यांची खर्चासह फेटाळणी करणे आवश्यक आहे.

अपील फेटाळले.

अपिलकर्त्यांसाठी अभिकर्ता : आर. आर. बीस्वास

उत्तरवादीसाठी अभिकर्ता : जी. एच. राजाध्यक्ष

----------

## अस्वीकरण

या न्यायनिर्णयाच्या मराठी भाषेतील या अनुवादाचा वापर हा पक्षकारास त्याच्या/ तिच्या मातृभाषेमध्ये त्याचा अर्थ समजून घेण्यापुरताच मर्यादित राहील आणि त्याचा इतर कोणत्याही कारणाकरता वापर करता येणार नाही तसेच इंग्रजी भाषेतील न्यायनिर्णय हाच सर्व व्यावहारिक आणि कार्यालयीन वापराकरता विश्वसनीय असेल आणि तोच त्यातील आदेशाच्या निष्पादन आणि अंमलबजावणी करता वैध मानला जाईल.

---------